आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२२ मे २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- यापुढं पाकिस्तानबरोबर चर्चा केवळ पाकव्याप्त काश्मीरवर केंद्रित असेल, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन /१०३ अमृत रेल्वे स्थानकांचं उद्घाटन, तर बिकानेर- मुंबई रेल्वे गाडीला दाखवला हिरवा झेंडा

- ऑपरेशन सिंदूरबाबत भारताची भूमिका मांडण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळांची संयुक्त अरब अमिरात आणि जपानच्या मंत्र्यांशी चर्चा

- वक्फ सुधारणा कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांवरचा हंगामी आदेश  सर्वोच्च न्यायालयानं राखून ठेवला

**आणि**

- येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात जोरदार पावसाची शक्यता/ रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना रेड अलर्ट

**<><><><>**

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करून भारतानं पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज राजस्थानमध्ये बिकानेर इथं विविध विकास कामांच्या उदघाटन प्रसंगी बोलत होते. पाकिस्तान भारताबरोबरचं थेट युद्ध कधीच जिंकू शकत नाही, त्यामुळे दहशतवादाला प्रोत्साहन देऊन छुपं युद्ध खेळत आहे. पहलगाम इथल्या हल्ल्यानंतर संपूर्ण देश दहशतवादा विरोधात एकवटल्याचं ते यावेळी म्हणाले. यापुढे पाकिस्तानबरोबरची चर्चा केवळ पाक-व्याप्त काश्मीरवर केंद्रित असेल, असं प्रधानमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

प्रधानमंत्र्यांनी आज बिकानेर इथून दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून देशातल्या १८ राज्यांमधल्या १०३ अमृत रेल्वे स्थानकांचं उदघाटन केलं. यात महाराष्ट्रातल्या १५ रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. परळ, चिंचपोकळी, वडाळा रोड, माटुंगा ही मुंबई उपनगरीय रेल्वे स्थानकं, त्याशिवाय सावदा, लोणंद, नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी जंक्शन, केडगाव,

लासलगाव, मूर्तिजापूर जंक्शन, देवळाली, धुळे, सावदा, चांदा फोर्ट आणि आमगाव या स्थानकांचा यात समावेश आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी या कार्यक्रमात बिकानेर-मुंबई एक्सप्रेस गाडीला हिरवा झेंडा दाखवला. ते म्हणाले..

**होल्ड- बाईट - -**

भारतीय रेल्वेमध्ये परिवर्तनकारी सुधारणा होत असल्याचं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यावेळी म्हणाले.

प्रधानमंत्र्यांनी या दौऱ्यात पलाना इथं सुमारे २६ हजार कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी, उद्घाटन आणि लोकार्पण केलं.

**<><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, सात बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळं येत्या १५ दिवसांत ३२ वेगवेगळ्या देशांना भेटी देणार आहेत.

खासदार **संजय कुमार झा** यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं आज जपानचे परराष्ट्र व्यवहार मंत्री ताकेशी इवाया यांची भेट घेतली आणि दहशतवादाविरुद्धच्या भारताच्या लढ्याला पाठिंबा देण्याची विनंती केली. पहलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्यात मरण पावलेल्या नागरिकांप्रती जपानचे परराष्ट्र मंत्री ताकेशी इवाया यांनी सहवेदना व्यक्ती केली. कोणत्याही प्रकारच्या दहशतवादाला समर्थन देणं चूक असून जपान दहशतवादाविरोधातल्या लढाईत भारतासोबत आहे, असं इवाया म्हणाले.

खासदार **श्रीकांत शिंदे** यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं आज सकाळी संयुक्त अरब अमिरातीत तिथले सलोखा विषयक विभागाचे मंत्री शेख नाहयान बिन मुबारक अल नाहयान यांच्याबरोबर चर्चा केली.

द्रमुक खासदार **कनिमोळी करुणानिधी** यांच्या नेतृत्वाखाली तिसरं शिष्टमंडळ स्पेन, ग्रीस, स्लोव्हेनिया, लाटविया आणि रशिया या पाच देशांच्या दौऱ्यावर रवाना झालं आहे. याचबरोबर खासदार बैजयंत पांडा, खासदार रविशंकर प्रसाद, खासदार शशी थरूर आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालील इतर चार शिष्टमंडळं येत्या काही दिवसांत वेगवेगळ्या देशांना रवाना होतील.

**<><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ विविध ठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. **नांदेडमध्ये** आज शिवसेनेनं तिरंगा मोटरसायकल रॅली काढली. **धाराशिव** शहरात देखील आज तिरंगा यात्रा काढण्यात आली.

रत्नागिरी जिल्ह्यातले माजी सेना अधिकारी लेफ्टनंट कर्नल प्रशांत चतुर यांनी ऑपरेशन सिंदूरबाबत प्रतिक्रिया दिली….

**होल्ड बाईट -प्रशांत चतुर (३३ सेकंद)**

**<><><><>**

वक्फ सुधारणा कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिका समूहावरचा हंगामी आदेश सर्वोच्च न्यायालयानं आज राखून ठेवला. सरन्या◌ायधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या पीठासमोर गेले ३ दिवस सुनावणी झाली. ती आज संपली.

केंद्र सरकारनं वक्फ सुधारणा कायदा लागू झाल्याची अधिसूचना गेल्या महिन्यात जारी केली.

**<><><><>**

महाराष्ट्राच्या विविध भागात आजही पावसान जोरदार हजेरी लावली. येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात जोरदार ते अती जोरदार पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज असून उद्या रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी केला आहे, मुंबईतल्या प्रदेशिक हवामान केंद्राच्या शास्त्रज्ञ शुभांगी भुते यांनी सांगितलं…

**होल्ड- बाईट - शुभांगी भुते (२८ सेकंद)**

**<><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनात शौर्यपुरस्कार सोहळा सुरु आहे. राष्ट्रपतीच्या हस्ते राजपुत रेजिमेंटच्या मेजर विजय वर्मा यांना शौर्य चक्र प्रदान करण्यात

आलं. या बरोबरच केंद्रीय राखीव पोलीस दलाचे उप कमांडर, विक्रांत कुमार, इन्स्पेक्टर जेफ्री हिमंगुचलो, वायुदलाचे विंग कमांडर दासमोंद कैने, स्क्वार्डन लिडर दिपक कुमार, विशेष पोलीसअधिकारी अब्दुल लतीफ, सुभेदार संजीव सिंग जसरोटा, कमांडर पवन सिंग, सुभेदार पी पुबीन सिंग यांना शौर्य चक्र प्रदान करण्यात आले.

मेजर आशिष डोंगचाक आणि पारदीप शौर्य आर्य साहब यांंना मरणोत्तर शौर्य चक्र देण्यात आलं. मराठा इन्फेंट्री चे मेजर माला राम गोपल नायजू यांना किर्ती चक्र प्रदान करण्यात आलं.

<><><><>

जम्मू-काश्मीरमध्ये, किश्तवाड जिल्ह्यात सिंगपोरा चतरू इथल्या जंगलात आज सकाळी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. गुप्तचर विभागाकडून मिळालेल्या माहितीवरून लष्करानं स्थानिक पोलिसांच्या सहकार्यानं राबवलेली ही मोहीम संध्याकाळीही सुरूच होती. २ ते ३ दहशतवादी सुरक्षा दलाच्या जाळ्यात अडकल्याचा अंदाज असून, या कारवाईत लष्कराचा एक जवान शहीद झाल्याचं आमच्या वार्ताहरानं सांगितलं.

<><><><>

अहिल्यानगर जिल्ह्याच्या अकोले तालुक्यातल्या ब्राम्हणवाडा गावाचे भूमिपुत्र संदीप पांडुरंग गायकर यांना आज जम्मू काश्मीरमधे दहशतवाद्यांशी लढताना वीरमरण आलं. ते लष्कराच्या १५ मराठा बटालियनमध्ये होते. उद्या त्यांच्यावर लष्करी इतमामात अंत्यस्कार करण्यात येणार आहेत.

<><><><>

महाराष्ट्रातल्या झुडुपी जमीन या वनजमिनी आहेत असं गृहित धरून त्यांचा समावेश वन संरक्षण कायद्या अंतर्गत करण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयानं आज दिला. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई, न्यायमूर्ती ए जी मसीह यांच्या पीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. या जमिनींचं रुपांतरण करण्यासाठी केंद्र सरकारची परवानगी घेणं आवश्यक असल्याचं न्यायालयानं स्पष्ट केलं. १२ डिसेंबर १९९६ च्या आधी वाटप केलेल्या झुडुपी जमीनी कुठल्याही भरपाईशिवाय नियमित केल्या जातील, मात्र त्यानंतर

वाटप झालेल्या जमीनींची कठोर तपासणी केली जाईल, त्यासाठी केंद्र सरकारची परवानगी लागेल, तसंच बेकायदेशीर जमीन वाटप केलेल्या अधिकाऱ्यावर कडक कारवाई केली जाईल, असंही न्यायालयानं सांगितलं. १९८० पर्यंतचे अतिक्रमण नियमित केले जातील, मात्र त्यानंतरची अतिक्रमणं विशेष कृती दलाद्वारे दोन वर्षाच्या आत काढून टाकण्य़ाचे आदेश न्यायालयानं दिले आहेत. उर्वरित पावणे आठ लाख हेक्टर झुडुपी जमीन वनीकरणासाठी वनविभागाकडे देण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले.

**<><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज अहमदाबाद इथं गुजरात टायटन्स आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात सामना होणार आहे. गुजरात टायटन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा लखनऊ सुपर जायंट्सच्या 6 षटकात बिनबाद ५३ धावा झाल्या होत्या.

//<><><><>//